
उन्मेष
२०२२-२३
शेगांव शिक्षण संस्था, शेगांव द्वारा संचालित
सेठ ग.भि. मुरारका कला वाणिज्य
महाविद्यालय, शेगांव

**प्रकाशक**
प्राचार्य, सेठ ग.भि. मुरारका कला वाणिज्य
महाविद्यालय, शेगांव, जि. बुलडाणा

**अक्षर जुळवणी**
सौ.प्रियंका लोडम
गोकुळ कॉलनी, अकोला

मुद्रक
**मुक्ता ग्राफिक्स् अँड पब्लिकेशन**
रणपिसे नगर चौक, अकोला
मो. : ९८५०४७१५२०

**विद्यार्थ्यांच्या वितरणाकरिता**

**प्रकाशन वर्ष**
२०२२-२०२३



श्री संत सद्गुरु गजानन महाराज, शेगांव



स्व.श्रीमान सेठ पुरणमलजी मुरारका
संस्थापक
शेगांव शिक्षण संस्था, शेगांव



स्व.श्रीमान सेठ मुरारीलालजी चतरभुजजी मुरारका

अध्यक्ष

शेगांव शिक्षण संस्था, शेगांव

# अनुक्रमणिका


- ❖ संपादकीय
- ❖ प्राचार्यांचे मनोगत
- ❖ संपादकीय मंडळ
- ❖ कार्यकारी संचालक मंडळ, शेगांव शिक्षण संस्था, शेगांव
- ❖ कार्यकारी संचालक मंडळ, स्थानिक व्यवस्थापन समिती.
- ❖ ग. भि. मुरारका कला वाणिज्य महाविद्यालय, शेगांव
- ❖ वरिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद
- ❖ कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद
- ❖ कार्यालयीन कर्मचारी वृंद
- ❖ ग्रंथालयीन कर्मचारी वृंद
- ❖ **साहित्य विभाग**
  - ❖ मराठी विभाग
  - ❖ हिंदी विभाग '
  - ❖ इंग्रजी विभाग
- ❖ विविध अभ्यास मंडळाचे अहवाल
- ❖ छात्रसंघ कार्यकारिणी (छायाचित्रांसह)


❖ ❖ ❖

# संपादकीय

लेखन हे व्यक्तीच्या पोक्तपणाचं एक वेगळं रूपच असते. माणूस हा तसा विचारी समाजप्रिय घटक आहे. पाहणे, ऐकणे, व्यक्त करणे किंवा लेखनातून स्पष्ट होणे हा निरंतर चालणारा प्रवास आहे. त्या प्रवासाचे प्रतिबिंब प्रत्येकाला होता येत असले तरी, लेखनकला ही त्याच्या अविरत चालणाऱ्या चिंतनाचं अंग असते. माणसांचे विचार जेव्हा पोक्त होतात, तेव्हा तो समाजाला नव्या ढंगानं पाहू लागतो. ती दृष्टी त्याच्यामध्ये येते किंवा त्याला निर्माण करता येते.

साहित्याच्या सहवासात माणसांचे चेहरे ओळखण्याचे प्रेरक असे तत्व असते. ज्याला तो घडला तो मोठा होण्यासाठी धडपडत असतो. तसा महाविद्यालयीन तरूण साहित्यात रमतो. त्याला समजून घेण्याचा प्रयत्न करू पाहतो. यात तो कधी यशस्वी तर कधी अयशस्वी होतो. परंतु प्रयत्न त्याला स्वस्थ बसू देत नाही. त्याची जिज्ञासा त्याला लेखन सन्मुख करते. म्हणून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वत:ला ओळखता यावं, लिहिता यावं यासाठी लेखन विचारपीठ 'उन्मेष' च्या माध्यमातून आम्ही आमच्या महाविद्यालयात 'उन्मेष' हा वार्षिकांक प्रकाशित करीत असतो. याबद्दलच्या सूचना विद्यार्थ्यांना देताच एक ओघ साहित्याचा त्यांच्याकडून आला व हा अंक नावारूपास आला.

शेगांव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीमान सेठ मुरारीलालजी मुरारका तसेच संचालक मंडळातील सदस्य श्रीमान सेठ संजयकुमारजी मुरारका यांच्या प्रेरणा याच्यामागे आहेत. महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. राम पांडे यांचे मार्गदर्शन व प्राध्यापक वर्ग तसेच विद्यार्थ्यांच्या सहकार्याने हा अंक आकारास आला.

मुक्ता ग्राफिक्स, अकोलाचे मालक सागर लोडम यांनी वार्षिकांकाच्या सुबक छपाईचे काम निर्दोष केले आहे. त्यामुळे, संपादक मंडळाचे पदाधिकारी त्यांचे आभारी आहेत. असे असूनही काही उणिवा राहिल्या असल्यास त्या संपादक मंडळाच्या मर्यादा समजाव्यात.

धन्यवाद !

**— संपादक मंडळ**

# प्राचार्यांचे मनोगत ...

महाविद्यालयाच्या भूमीत पाय टाकताच प्रत्येकाच्या प्रज्ञेला नवे धुमारे फुटू लागतात आणि हे नैसर्गिकही आहे म्हणा! जस–जसा विद्यार्थी रुळायला लागतो, तस–तशी त्याची हालचाल सर्वांच्या नजरेचा ताबा घेऊन जाते. त्याचं कारण त्याच्या वैचारिक विश्वाला एक सुरुवात झालेली असते. तो बोलतो, लिहितो आणि त्याने लिहावे हे सुध्दा अपेक्षितच असते. परंतु त्यासाठी हवी असते त्याला त्याच्या विश्वाची व्यापकता. त्यासाठी तो धडपडतो. कधी त्याची दमछाकही होते. परंतु तो मिळवतो आपलं एक अखंड आकाश आणि त्याला ते मिळवताच येत नसेल तर, त्याचं नवं व्यासपीठ त्याला खुणावते – ते 'उन्मेष' च्या रूपाने. 'उन्मेष' हा असाच वैचारिक वारसा जपणारा वार्षिकांक. जो महाविद्यालयातून सर्वांच्या परिश्रमातून उभा राहतो.

या २०२२–२३ च्या सत्रात आम्ही विद्यार्थ्यांकडून 'उन्मेष' साठी साहित्य मागितले. त्याला विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. यामध्ये विषयाचं वैविध्य जपण्याचा आम्हीही प्रयत्न केला. विद्यार्थी लिहिते झाले व वेळेच्या आत त्यांनी आपलं साहित्य जमा केलं व उन्मेषला आकार देता आला. विद्यार्थ्यांच्या या प्रयत्नाचं स्वागत होईल, ही अपेक्षा आहेच.

'उन्मेष' या वार्षिकांकाला साकार करणे एवढे सोपे काम नव्हते. परंतु शेगांव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीमान सेठ मुरारीलालजी मुरारका, सचिव श्रीमान सेठ नंदकिशोरजी मुरारका यांच्या व संचालक मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या प्रेरणेने हा अंक साकारता आला. विशेषत: श्रीमान सेठ संजयकुमारजी मुरारका, संचालक मंडळाचे सदस्य यांनी दिलेले विशेष सहकार्य मोलाचे ठरले. महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद संपादक मंडळातील सर्व सदस्य यांनी अंकासाठी अथक प्रयत्न केले. त्यामुळेच हा अंक तयार होऊ शकला.

**प्रा.डॉ. अनिलकुमार राठोड**
प्राचार्य,
ग. भि. मुरारका महाविद्यालय, शेगांव
शेगांव शिक्षण संस्था, शेगांव

शेगांव शिक्षण संस्था, शेगांव

ग. भि. मुरारका कला व वाणिज्य महाविद्यालय, शेगांव

# संपादक मंडळ

प्राचार्य डॉ.अनिलकुमार राठोड

प्रा.डॉ.व्ही.एन. इंगळे

प्रा.डॉ.व्ही.एम. डेहनकर

प्रा.डॉ.व्ही.के.गायकवाड

प्रा.कु.एन.एस.राजगुरू



# 'बाबा'

स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी, आई किती गोड शब्द आहे. खरचं आई काय असते? लंगड्याचा पाय असते, दुधावरची साय असते, आईची किंमत काय असते हे कोणीच सांगू शकणार नाही. म्हणूनच संतांनी म्हटले आहे. एखादा माणूस कितीही मोठा व्यक्ती झाला. तरिही तो आईविना भिकारीच. आईची गणना जिथे तिथे होते पण बाबाच काय?

कविंनी आईवरच खुप कविता केल्या आईलाच खुप किंमत दिली. बाबावर केल्या का कोणी? ज्याप्रमाणे आपल्या जीवनात आईची गरज असते त्याचप्रमाणे बाबाची ही गरज असते. आपल्याला आजही माँ जिजाऊची आठवण येते कारण शिवाजी महाराजांना घडवणारी त्याची आई होती म्हणून पण मुलांच्या सुखासाठी प्रायचित करणारे संत ज्ञानेश्वरांचे वडील म्हणजे विठ्ठलपंत कुलकर्णी यांना आठवा म्हणजे वडिलांची किंमत कळेल. बाळाच रागावण हेही आपल्यावर असलेले एक प्रेमच आहे. मुलावर एखादे संकट आले तर आई रडून आपले दु:ख व्यक्त करत असते. तेच बाबा आईला आधार देतात. पण बाबाला कोण आधार देणार? बाबाच स्वत: स्वत:चा आधार बनतात. आई रडून मोकळी होते. त्यात बाबा रात्ररात्र जागरण करतात. मुलांसाठी मनातल्या मनात कुढत बसतात, हळूच मुलाच्या खोलीमध्ये जावून पाहतात. घराचा कर्ता पुरूष म्हणजेच बाबा असतात तोपर्यंत कोणीही आपल्या घरावर वाईट नजर टाकत नाही. जसे आपल्या जीवनात आईचे स्थान आहे. त्याचप्रमाणे बाबांचे ही फार मोठे स्थान आहे. एखादा पुरूष फार यशस्वी झाला तर तो सांगतो माझ्या आईचा माझ्या पाठीशी मायेचा हात आहे म्हणून मी यशस्वी झालो व मी जीवनात मोठा व्यक्ती बनू शकलो. पण तो बाबाला विसरतो.

जीवनात जितकी आईची गरज आहे. तितकीची बाबाची ही आहे कविंनी म्हटले आहे, 'स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी' पण मी म्हणतो स्वामी तिन्ही जगाचा बाबा विना भिकारी.

**— हर्षदिप डोंगरे**
बी. ए. तृतीय

# तुझ्याबद्दल

फक्त तुझ्यासाठी
सांग प्रियकरा सांग तुझे
माझ्यावर प्रेम आहे का?
रात्रंदिवस तुझ्या स्वप्नात मी डुबते
तुझे माझ्यावर प्रेम आहे का?
याच विचारात राहते,
मनातील आठवणी सरत नाहीत
मनातील शब्द ओठावर येण्यास
घाबरतात
माझ्या मनात जे,
प्रेम आहे तुझ्याबद्दल
त्याला तू अजूनही ओळखले नाही
सांग प्रियकरा सांग...
तुझे माझ्यावर प्रेम आहे का?
खुप आशा बाळगून बसलीय मी मनी
कधी तरी तू येशील?
जे मी बोलायला घाबरते ते तू बोलशील?
तू माझ्या आयुष्यात
येवून माझं जीवन बहरून टाकावं
तू मिळाल्यानंतर जगातील कोणत्याच सुखाची
मला पर्वा नाही,
तू माझ्या जीवनात येशील
ह्याहून मोठे भाग्य कुठलेच नाही.
असे मानूनी मनात
अजूनही तुझी वाट बघतेय
सांग प्रियकरा सांग
तुझे माझ्यावर प्रेम आहे का?
तुझ्याशिवाय जीवन आहे माझे उदास
निरर्थ, चिंतातूर
तू दूर असूनही नेहमी जवळ
असल्याचे भासते.
जीवनात तुला कधीच न विसरण्याची
शपथ घेतलीय मी,
त्यातच माझा आनंद आहे
सांग प्रियकरा सांग
तुझे माझ्यावर प्रेम आहे का?
कसे सांगू माझ्या मनातील
दुःख तुला
कधीच ओळखू शकणार नाहीस तू
त्याला
जेव्हा कधी येता समोर तू दुःखाचे
वादळ उठतात मनात माझ्या
समोर असूनसुद्धा मनातील बोलू
शकत नाही तुला,
सांग प्रियकरा सांग तुझे
माझ्यावर प्रेम आहे का?
जर आयुष्यात भेटला
नाही तू मला तर याहूनी मोठे
दुःख कुठलेच होणार नाही मला,
पण जगातील कोणत्याही
कोपऱ्यात राहशील तू
सुखी राहो तू एवढीच
शेवटच्या श्वासापर्यंत प्रार्थना करते
।ईश्वराला।।
सांग प्रियकरा.....
तुझे माझ्यावर....!

**– प्रसेनजित वानखडे**
बी. ए. द्वितीय

# मैत्री

जीवनाचं असावं आपलं एक वेगळ सूत्र
समजून घेणारा किमान असावा एक तरी मित्र
मैत्री असावी फुलासारखी दुरवर सुगंध देणारी
वसंत ऋतुप्रमाणे मनसोक्त बहरत जाणारी
मैत्री असावी अशी — अशी जीवाला जीव
देणारी मैत्रीवर होणारा वार स्वत: वरती
घेणारी आणपही मैत्रीसाठी
आयुष्य आपलं लावावं
मृत्यू जरी आला तरी एक निष्ठेन वागावं
तेव्हाच मैत्रीचे नाते कायम राहील
तिचा महिमा सृष्टीपण गाईल

**अश्विनी शेजोळे**
बी. ए. प्रथम

# लग्न

लग्न म्हणजे आयुष्याचं रिझर्व्हेशन असतं
त्यानंतरची तडजोड म्हणजे प्रिझर्व्हेशन असतं
डोळ्यात आसू अन ओठावर हसू
एव्हढच आपल्याकडून एक्सपेक्टेशन असतं
सर्व स्त्रियांनी नवऱ्याचं नावं
घ्यायचं कारण त्याच्या जीवनात
त्याचं नॉमिनेशन असतं

**शुभम खर्डे**
बी. ए. तृतीय

# आई

आई घरात प्रकाश देणारा दिवा असते
नि:स्वार्थ प्रेमाची दवा असते
घरात खेळती सुगंधी हवा असते
घरातला देव असते

आई किती वर्णावी तुझी खोल आठवण
जरी खपली धरली नाही सुकली जखम
अजूनही आहे ओले माझ्या हृदयाचे घाव
नाही विसरता येत आई तुझा मोकळा स्वभाव

आई करिता जीवन सुखात गेले
माझे सर्व लाड तुच पुरविले
तुला शत शत नमन तुझ्या लाडलीचे
दु:ख देवू नको मजला विरहाचे

**—अजय सावळे**
बी. ए. प्रथम

# जातीला जात वैरी

नजरेला नजर मिळवित
ती माझ्याकडे पहात होती
मी समजू शकलो नाही
ती एक प्रेमाची बात होती
किंचित हसणे कधी लाजणे ही तिची प्रित
होती प्रेमापासून दुरावलेला मी
हिच माझ्यात वेड्यची रीत होती.
चंद्रालाही लाजवेल अशी झळाळी
तिच्या चेहऱ्यावर दिसत होती
मला सावळा मनोहर मानून ती आपल्या हृदयी
पुजित होती.
तेव्हा भानावर आलो मी
हिच तिच्या प्रेमाची जीत होती
राधा मानून हृदयी पुजले तिला
मला समजून घेणारी तिच एक होती.
भावी जीवनाचा स्वप्नमहाल ती उभारीत होती
माझ्यात रममाण होवून
सोबतीला प्रेम गीत गात होती
जात आडवी आली लग्नाला
हिच पराभव सांगणारी ज्योती होती
नियतीने कसा खेळला क्रूर डाव
ही तर जिवंतपणी
माझ्या प्रेमाची मौत होती

— अर्जुन शेगोकार
बी. ए. तृतीय

# आई



आई सदा करत असते काम
पण घेत नाही काहीच दाम.
आई सर्वांची घेते काळजी
पण तिची नाही
कोणाला काळजी.
आई सर्वांना ठेवते आनंदी
आटू देत नाही
कधीच प्रेमाची नांदी
आई मुलांबाळांचे करते लाड
तिच घरात करत राहते सदा तडजोड.
सावित्रीप्रमाणे करते
सदा बाबांची सेवा
तिला मात्र मिळत
नाही कधीच मेवा.
आम्हाला मिळते दर रविवारी सुटी
तिला मात्र कधीच रजा
मिळत नाही कामातून.
आई मी आहे तुझे लाडके लेकरू
आई मी तुला कसे बरे विसरू

**— ज्ञानदेव चोपडे**
बी.कॉम.द्वितीय

# मैना

डोंगराच्या वाटेनं ही कोण?
बी. कॉम प्रथम
मैना हिंडते, तिच्या राघोबाला ती
काकुळतेने धुंडते....
संध्याकाळच्या पायरी त्यांच्या
होत गाठी भेटी, जन्माजन्माची
त्यांची अशी जळली नाती
डोंगराच्या वाटेनं ही कोण मैना हिंडते...
लाली तिच्या गालाची
आभाळात पसरली
रूप तिचे पाहून दृष्टी चंद्राची फिरली,
हे पाहून उर्वशी
स्वर्गी ही रूसली
डोंगराच्या वाटेनं ही कोण मैना हिंडते...
दिवसामागे दिवस कसे निघून गेले
कोण्या पारध्याने ते घेवून गेले
सुखाचे दिवस हे दु:खात बदलले
दिसला नाही तो, त्याला ती धुंडते
झलक त्याची मनी घेवून फिरते.
कळताच राघवाचा मैनेला संदेसा
डोळ्यातून वाहे आसवांच्या धारा.
गोजिरवाना होता संसार
होती प्रेमाची बहार,
दृष्ट लागताच पारध्यांची
तुटली जन्माची ही गाठी
रस्त्याच्या वाटेने आता मैना
एकटीच हिंडते मैना  एकटीच हिंडते !!

**— सुभाष तायडे**
बी.कॉम.द्वितीय

# आपली मैत्री

कोण म्हणते?
आपुलकी फक्त
रक्ताच्या नात्यातचं असते...?
छे !
रक्ताची नाती, कुटुंब
ह्या सगळ्या सीमा झाल्या
सत्य फक्त एकचं....
नात्यातलं प्रेम, स्नेह
आणि जिव्हाळा !
नातं... मग ते कुठलेही असो
एकमेकांविषयी आपुलकी असली
की ते रूजायला
फारसा वेळ लागत नाही...
रक्ताच्या नात्याचे नसलो तरी
आपल्या नातं हे आयुष्यभर
रक्ताच्या नात्यापेक्षाही
एकमेकांना अधिक जपणारं असेल
याची मला खात्री आहे
कारण हे नातं म्हणजे
आपली
अतुट मैत्री आहे.

**— सुरज राऊत**
बी.कॉम.द्वितीय



# असही प्रेम असतं

एकदा एक झाड वेलीच्या प्रेमात पडलं. तिला पाहताच त्याला तिच वेड लागलं. वेलीला विचारू तरी कसा? या प्रश्नाने त्याला झपाटलं होतं पण आपण जरा धीर धरावा अस म्हणत त्याने स्वत:ला सावरलं.

वेल मात्र आपली हसत खेळत राहत होती. ते पाहून झाडाने तिच्याशी मैत्री केली होती. काही दिवसाने मात्र जमिनीवर पसरू लागली. ते पाहून झाडानं तिची विचारपूस केली. वेलं म्हणाली झाडा मला तुझा आधार हवा आहे.

तू मला आधार देशील का? या वरून झाड म्हणाले तू माझी होशील का? हे एकताच वेलीने नकारार्थी मान हलवली. ते पाहून झाडाची निराशा झाली. हिरमुसलेले ते झाड क्षणभर विचारात पडले. विचार करून त्याने वेलीला आधार देण्याचे वचन दिले.

वचन देताच वेल मात्र झाडाला बिलगली अन् हसता त्याची आसवे हळूच ओघळली. आसवे पुसत पुसत त्याने तिला आधार दिला. कारण तिला आधार देणं हा त्याच्या प्रेमाचा भाग झाला.

आठवणींचे ओझे काय असते ते एकदा पेलवून बघ. रडत असलेले डोळे पुसत एकदा तरी हसण्याचा प्रयत्न करून बघ. सोपे नसते रडणं तुझ्या अश्रूंची चव चाखून बघं.

माझ्या तुला सांगण्याचा हेतू एवढाच एकदा का होईना, माझ्याशी मैत्री करून बघं.

**— अक्षय राण**
बी.कॉम. तृतीय

# कराव तरी काय कराव?

जगावं की मरावं
कराव तरी काय करावं?
एक क्षण वाटतं मरावं
दुसऱ्या क्षणाला वाटतं जगावं
मराव तरी का मरावं?
जगाव तरी का जगाव...?
मरून कुणासाठी भटकांव?
जगूण कुणासाठी रडावं?
जगाव की मरावं कराव तरी काय कराव?
जगून जगून का मरावं?
कमरून मरून का जगावं?
जगून मरणे व्यर्थ नाही
मी मरून जगण्यासाठी अर्थ नाही
जगांव की मरावं करावं तरी काय करावं?
जगून सुखाची आस आहे
मरून भुताटकी वास आहे
जगून सुरू करावं झेलावे काय?
मरून सर्व संपवून जावे काय
म्हणून शेवटी एकच वाटतं
जगावं की मरावं
करावं तरी काय करावं?

**— दिपक गाळकर**
बी.कॉम. तृतीय

# सखी

सखी अंग सखी
हे तुला लिहलेलं शेवटच पत्र असेल
तुझी पत्रिका माझ्या हातावर तर
माझे मृत्यु पत्र तुझ्या हातावर असेल
रंग लागेल आपणा दोघांनाही
फरक एवढाच तुझा हळदीचा तर
माझा असेल रक्ताचा
जेव्हा लागेल मेहंदी तुझ्या हातावरी
माझी असेल जागा सरणावरी
सखी अग सखी
मी तुझ्यावर केलेले प्रेम
या जन्मी आठवेल का तुला कधी
मी ही मांडल्या होत्या प्रेमराशी
पण आपले मिलन नव्हते नशीबी
तुझी जेव्हा डोली उठेल तेव्हा
तुझ्या सोबतीला मी ही असेल
फरक एवढाच तू दोन तर
मी चार खांद्यावर असेल
सखी अग सखी
तू तुझ्या जीवनात
नेहमी राह सुखी
जेव्हा तुझी डोली जाईल पतीच्या घरी
तेव्हा मी मात्र जाईल....

**— एक कवी**

# प्रेम

पुष्कळदा ठरवतो सांगाव तुला
पण मला धीरच होत नाही
मनातलं सारं मनातचं राहतं
ओठावर काही येत नाही
अशी कशी मी हाक हाक देवू
सोपं वाटतयं का ते तुला
जगाची रीत
मनातली प्रित
सर्वांचा विचार करायचाय मला
म्हणून अपेक्षा करत राहतो मी
तू काही तरी बोलण्याची
खरं तर मीही वाट पाहतो
मी तुला प्रतिसाद देण्याची
माझे शब्द नाहीत महत्वाच्या भावना तर
कळल्या ना तुला
सगळ्याच गोष्टी सांगता येत नाही
थोडसं समजून घे न मला.

**—अभिलाष मनतकर**
बी.ए.प्रथम



# क्षणभर केलस प्रेम माझ्यावर

क्षणभरच केलस प्रेम माझ्यावर
खरं असो अथवा खोटं
जीव लावून बसले मी तुझ्यावर
गोड शब्द तुझे मधूर भासले
मंजुळ स्वर ते बांसरीवाले
राधे परी मी वेडी झाले
भुलून गेले तुझ्या सावळ्या रूपावर,
मनात तुझ्या होता वेगळाच डाव
निरपेक्ष प्रेमाला नसते कुठलीच हाव
निर्मळ मनात होता, निर्मळच भाव.
वाहिली फुले तनमनांची तुझ्या चरणावर
दूर जाहले मी जरी तुझ्या मार्गातूनी
तरिही दिसते कां, तुझेच रूप ध्यानी मनी
काढीले चित्र तुझेच सावळे रूप आठवूनी
भोळ्या मनांची ही प्रित भाबडी
ऐकं सांगते तुला जाता जाता
मी प्रेम तुझ्यावरच करणार
तुला ते कधीच नाही कळणार

**—अक्षय बाभुळकर**

# मैत्री

मैत्री कशाला म्हणतात?
जी आपल्या संकटाला
धावून येत असते
मैत्री कशाला म्हणतात?
जी आपल्याला चांगला
मार्ग दाखवते
मैत्री कशाला म्हणतात?
जी आपल्या विश्वासाचा
घात करत नसते
मैत्रीमुळे तर
आपण जगू शकतो
मैत्री नसेल तर
जीवन जगणं व्यर्थ असतं
मैत्री एक अतुट बंधन असते
जी मैत्री कोणाच्या तोडल्याने
तुटत नसते,
तिच खरी मैत्री असते

**—मंगेश गवई**
बी.ए.प्रथम



# तुला भेटण्याचा आनंद

तुला भेटून फार आनंद होतो
तू दूर जातांना फार दुःख होते
तुझी वाट बघता बघता
सकाळची संध्याकाळ होते.
असे होता होता दिवसा मागून
दिवस जातात
तुला एक नजर पाहण्यासाठी
मन माझे प्रत्येक क्षणी व्याकूळ राहते
तुझ्या आठवणीत दिवसाची रात्र होते



**—मंगेश गवई**
**बी.ए.प्रथम**

# वाट

वेड्या मनाला कितीदा बजावलं
कोणाची वाट बघायची नाही समजावलं
केविलवाणी अवस्था झाली माझी
सारखी सारखीच वाट बघतेय तुझी
चुकून जरी कोणाची लागली चाहूल
मला वाटे अडले असेल तुझेच पाऊल
तुझ्या आठवणीने मन माझे मोहरते
तू येशील म्हणून वाट बघत राहते
वाट बघतच वाट संपणार आहे आयुष्याची
कशी आशा करावी तुझ्या येण्याची

**—राहूल पहूरकर**
बी.ए.प्रथम

# जीवन

सुख दुःखाचे काटेरी
कुंपन ओलांडायचे आहे
जीन जगतांना
सुख वाद जुळवायचा आहे
मैत्री करतांना
चांगला अभ्यास करावयाचा आहे
प्रगती करतांना
चांगलं वाईट थोडं रडायचं आहे
प्रेम करतांना
सर्व दुश्मनी सोडून द्यायची आहे
यश मिळवताना
सर्व जुन्या जागृती ठेवायच्या आहे
पराजय झाला तर,
निराश व्हायचं नाही
जय झाला तर
गर्व करायच नाही
सुख दुःखाचे काटेरी
कुंपन ओलांडायचे आहे.
जीवन जगतांना....

**—अमित मुकुंदे**
बी.ए.प्रथम

# प्रिती

नाही खाणाखुणा
नाही इशारे
पण मला कळले त्याच्या
डोळ्यातले भाव सारे
कधी स्वप्नात तर कधी जागेपणी
भेटून जातो रोज मला
मनोमनी प्रेम आहे त्याच्यावर
कसे सांगू समजेना
हे खरे आहे की माझं
मज मलाच उमजेना
ओठांवर हसू अन मना भीती
त्यासाठी मनात तेच आहे

**— अजय तायडे**
बी.ए.प्रथम

# राष्ट्रपुरुष

लागा हे राष्ट्रपुरुषा तुला कोटी कोटी प्रणाम !
स्वतंत्र भारतात या ओतलेस तू पंचप्राण
लिहिण्या देशाची घटना तू केलेस जीवाचे रान
कोण होते तुझ्याविना समर्थ पेलण्यास हा भार
नेत्यांना सगळ्या होती चिंता
कसे आखावे देशाचे संविधान
आंबेडकर आठवले राजेंद्र प्रसादांना
मसुदा समितीचे दिले अध्यक्षस्थान
म्हणूनच तू आहेस घटनेचा शिल्पकार
हे राष्ट्रपुरूषा तुला कोटी कोटी प्रणाम.....

**—सुरज भोजणे**
बी.कॉम.द्वितीय



# मैत्री

मैत्री एक नात असते
रक्तापेक्षाही जवळचे असते
मैत्री एक विश्वास असतो
त्यावर सर्व निर्भर असते
मैत्री एक आस असते
तिच जीवनाची साथ असते
मैत्री एक जवळीक असते
जो शेवटपर्यंत कायम असते
मैत्री एक ओलावा असतो
तो कधीच सुखात नसतो
मैत्री एक श्वास असतो
जो प्रत्येकाला हवा असतो
जो एक आनंद असतो
जो प्रत्येकाला नवा असतो
मैत्री असते एक शिदोरी
जी सरतही नाही आणि
उतरही नाही.

**— प्रदिप जाधव**
बी.ए.प्रथम

# तुच सांग प्रिये

तुच सांग प्रिये मला
प्रेम कसं करायचं?
किती वेळा मी तुझ्या
दारूवरून फिरायचं?
वर्गात तू जेव्हा बसतेस
तेव्हा खिडकीतून बघायचं
आणि मास्तरांचे लक्ष जाताच
वचकल्यावानी करायचं
जमिनीवर पेन पाडून
तिरकूं तरी बघायचं
अन या आतुरलेल्या मनाला
समाधानी करायचं
प्रेमपत्र तयार केलं
तुला द्यायच पक्क झालं
वरचा कागद रंगीत होता
अत्तराचा त्याला वास होता
कागद तसा साधाच होता
पण, त्यातच माझा जीव होता
मग, मी कागद घेवून
हळूहळू दाराकडे सरकायचं
तुझा बाबा आडवा यायचा
तेव्हा मी काय करायचं?
घरी तुझ्या आल्यावर
तुझ्या आईनं थोडसं हसून
मला पाटावरती बसवलं
अन् तुझ्या हातून राखी बांधून
घरी मला पाठवलं
तुच सांग प्रिये मला
प्रेम कसं करायचं?

**—प्रसेनजित वानखडे**
बी.ए.तृतीय

# अनमोल रत्न आई

जीवनाच्या काळोख्या रस्त्यावर
सूर्य बनून प्रकाश देणाऱ्या आई—वडिलांच्या
जीवनात कधी 'काळोख पसरवू नका.

ज्या दिवशी तुमच्या
आई—वडिलांच्या डोळ्यामध्ये
अश्रूधारा वाहतील,
लक्षात ठेवा त्या दिवशी
तुम्ही आतापर्यंत केलेले
ते कर्म वाहून गेले असतील
म्हणून त्यांना कधी दु:ख देवू नका

जिला कोणती उपमाच दिल्या जात नाही
तिचे नाव आहे — आई
जिची कोणतीच सीमा नाही
तिचे नांव आहे — आई
जिच्या प्रेमाला कधीच पानगळ
स्पर्श करीत नाही
तिचे नांव आहे — आई
हे युवक । ईश्वराला प्राप्त करण्याची
पहिली पायरी आहे — आई

**—अर्जुन शेगोकार**
बी.ए.तृतीय

# सुखाचे रोपटे

प्रेम म्हणजे काय असतं
एक लहान रोपटं असतं
ज्याला आपुलकीची माया व
विश्वासाचं खत देवून
जपायच असतं...
सूर्याच्या उष्णतेप्रमाणे
परिस्थितीची जाणीव करून
द्यायचं असतं...
निर्मळ खळखळत्या पाण्याप्रमाणे
सदैव त्याच्या पाठीशी राहून
त्याला वाढवायचं असतं...
काळ्या सुपिक मातीप्रमाणे
त्याला उबदार व कायमचा
आधार द्यायचा असतो...
रणरनते ऊन, जोरदार पाऊस जीवनात
येणाऱ्या अशा संकटापासून
रक्षण करायचं असतं...
मनापासून साथ जर दिली
तरचं ते इवलेसे रोप
पुढे मोठे बळकट व विशाल
झाड होते त्याला सुख व
समाधानाची फुले व फळ लागतील

**—अंकुश बोर्डे**
वाणिज्य भाग तृतीय

# प्रभात उजळली

प्रभात उजळली
रवि वरती लिला चढली
रजनी ही लाजून गेली
पडले किरण सोनेरी
प्रभात पुष्प होवून आली भुवरी
स्वागत केले निर्मळ मनानी
प्रभात गाई निसवर्गाची गाणी
कोवळे किरणे अंगाला स्पर्श करती
भिरभिरणारे पक्षी पिंगा घालती
सारे न्हावून गेले रूपेरी उन्हात
मन सुखावूनी गेले
चंदेरी दुनियेत गुलाब, मोगरा, शेवंती
वाऱ्यावर डोलती
प्रभात आली घेवूनी मंद हवा
रात्र संपली झोप संपवा
जेव्हा येईल प्रभात
मिळे आनंदी आनंद
चोहीकडे सुगंधी सुंगध
प्रभात आली, प्रभात आली.

**—ज्ञानेश भगवान गवई**
बी. ए. प्रथम

# तुझी आठवण

तुझी प्रत्येक आठवण
रात्र–रात्र जागवत असते
तू भेटत नाही म्हणून
मन मलाच रागवत असते
एक सारखा माझ्या मनावर
तुझ्या आइवणींचा मेघ पसरतो
वाट पाहणाऱ्या डोळ्यातून
गालावर हळूच थेंब घसरतो

**–दिपक दांडगे**
बी.कॉम.प्रथम

# प्रिय आई

कुणी म्हणतं मॉम,
मम्मा, कुणी मम्मी
पण प्रेम स्वरूपात
मात्र कधीच होत नाही
कमी जिचं प्रेम सरत नाही
आणि उतरही नाही
तिला चारोळीत बंद
करणं मला जमत नाही.

– कमलेश भालेराव
बी. कॉम द्वितीय

# आई सारखी आईच

आईसारखं कुणी नाही
आईसारखी आईच!
दिवसातून तिला मी
शंभर हाका मारते
आई आई करते
घरभर हिंडते
आई म्हणते, पुढे बोल !
नुस्त काय आई, आई !
आईसारखं कुणी नाही
आईसारखी आईच!
आईपाशीच हट्ट करावा
खुप मज्जा येते
आईच्या हातचाच मार खावा
कधी लागत नाही
आपण रडतो तेव्हा
आई म्हणते अग 'वेडाबाई !'
आईसारखं कुणी नाही
आईसारखी आईच

**– अभिजित डोसे**
बी.ए.प्रथम

# आयुष्याचा ताव

दु:ख सुख, राजा रानी
दोघे नांदती गुमान
कोऱ्या कागदाच गाणं
कोरूया कागदाचं गाणं
उभ्या आयुष्याचा ताव
होता कोरा, कोरा भाव
बालपणी खेळण्याला
कोऱ्या कागदाची नाव
आला आला रे वयात
आल लोळण गयात
आहे कागदी ही सोब
उगा चाळी कोरीपान... कोऱ्या ....
आल उतरत वय
मुखी हरी, जय जय
जुन्या कागदाला खाई
नव्या कागदाचा भय
देती–देती रे फाडून
खोट – नाट बनवून
इथे आजच्या चलनी
कुठे चाली जुन नाण .... कोऱ्या
आत विझली रे वात
होता भला म्हणतात
जीत्यापणी हळहळ
मेल्यावरी रडतात
देती मुठ मुठ माती
कोरी पीटती रे छाती
आधी धन सावटण
मग मुखी तुळसीपान.... कोऱ्या ....

**– श्रीकांत तायडे**
बी. कॉम. तृतीय

# माय माऊली

माय वदी कुणास
अजान ते बालक
पडे मनी प्रश्न
नये जया माय
महती मायेची वदविली संतांनी
का उगाच म्हणती
आईविना भिकारी
असे स्वामी जगाचा
आणि तिन्ही ठायी
विना माय ममतेचा
नव्हे तया शांती असे एकची धाम
तया पायगुनी त्रैलोक्यीचे पुण्य
मिळे आपणासी नसे पुण्यकर्म
दुजे आणिक ते करे जो चाकरी
माय बापाची मिळते स्वर्ग सुख
नको जाऊ राऊळी असे ईश तीच
वदे सर्व संत तिच जन्मादाती
अवघेची संसारी दावी जग हे
कुस उजाळूनी दु:ख घेई प्राशूनी
नाना तया कळा देई मायेची पाखरं
नसे फळाची चिंता अखंड तो झरा
वाहे ममतेचा क्षुद्र आम्ही जीव
तमा नसे आम्हा घडो सर्वदा सेवा
मम हस्ते मायेची
घ्यावा मोक्ष जगी
करूनी चाकरी तयेची

**–ज्ञानेश्वर माळी**
बी.कॉम. तृतीय

# खरे सौंदर्य

सौंदर्य फक्त नाही रंगात
सौंदर्य फक्त नाही डोळ्यात
सौंदर्य फक्त नाही ओठात
सौंदर्य फक्त नाही बांध्यात
सौंदर्य आहे वाणीत
सौंदर्य आहे सत्यात
सौंदर्य आहे मनात
सौंदर्य आहे संस्कारात
सौंदर्य आहे कलेत
सौंदर्य आहे लज्जेत
सौंदर्य आहे ममतेत
सौंदर्य आहे दयेत
सौंदर्य तर आहे हसण्यात
सौंदर्य तर आहे हसवण्यात
सौंदर्य आहे भावनेत
सौंदर्य आहे ह्दयातील प्रेमात
इतक्या सद्‌गुणांचे
सौंदर्य सोडून तरिही
लोक बघतात फक्त सौंदर्य!
रंगाच, डोळ्यांच,
ओठाचं, बांध्याच
तेव्हा खुप वाईट वाटते
काय कधी तरी ही तरूण पिढी
खऱ्या सौंदर्याला समजू शकतील?

**–ज्ञानेश्वर वानखडे**
बी.ए.तृतीय

# मैत्री

मैत्रीच चांदणं जेव्हा
मनाच्या आभाळात उतरत
त्याच्यासाठी जगायला मग
मन आपलं आतुरतं
मैत्री म्हणजेच सुखामध्ये
समोरच्याला हात देण
मैत्री म्हणजे दु:खामध्ये
समोरच्याच हात घेण
दोघांच्याही मनात दडलेल
भावनाच एक गाव आहे
आणि भावनाच्या त्या गावाला
मैत्री हे एक नांव आहे.
देण्या–घेण्याची बेरीज
मैत्रीमध्ये शून्य आहे
मैत्री ही गणिताची रीत
म्हणूनच मला मान्य आहे
मित्र म्हणजेच एक झाड
वळणावर वाढणार
आपली सावली होण्याकरिता
उन्हासोबत लढणार
कधीतरी मैत्रीचा प्रकाश
आपल्या मनामध्ये पसरतो
आणि त्या प्रकाशात मग
आपण आपल्यालाच विसरतो
मैत्री म्हणजेच थोड घेणं
मैत्री म्हणजेच खुप देण
मैत्री म्हणजेच देता–देता
समोरच्याच होवून जाण
मैत्रीचे नाते हिच किमया करून
जाते आणि काही न मागता
फक्त देतच राहते ती
म्हणजेच अनमोल अशी मैत्रीच असते

**–सागर वानखडे,** बी.कॉम.तृतीय

# प्रिय शेतकरी राजा

तू मुकुटाशिवाय राजा आहेस
सिंहासनाशिवाय सम्राट आहेस
पालककर्त्या विष्णूचा अवतार आहे
मानवी संस्कृती जपणारा ब्रह्मा तू ।।१।।

अन्नदानाचा निरंतर यज्ञ
तू आरंभलेला आहेस
यज्ञकुंड धगधगत ठेवण्यासाठी
स्वत:चीच आहुती देत आहेस ।।२।।

नाही तुला कुणाचे संरक्षण
नाही कुणाचे आरक्षण
तरिही राबतोस उन्हा—पावसात
जीवनाचा प्रत्येक क्षण ।।३।।

तू महायोगी आहेस
अन्नदाता आहेस
विश्वपिता आहेस
सृष्टीचा भाग्यविधात आहेस ।।४।।

काळ्या आईवर पुत्रवत प्रेम करणारा
तू खरा भूमिपूत्र आहेस
आमच्या सुख—समृद्धीचे
बीज आहेस त्याहीपेक्षा
आमच्या शांत आणि समाधानी
जीवनाचे बीज आहेस ।।५।।

**— ज्ञानेश्वर लहाने**
बी.कॉम.तृतीय

# प्रेम

कधी फुलात पाहतो,
कधी कळ्यात पाहतो
आणि कधी ईश्वराला
तुझ्या डोळ्यात पाहतो
कवितेला नाही मोल
कादंबरी फिक्की पडे
मोठ, मोठे ग्रंथ शून्य
तुझ्या प्रेमापुढे
तुझं उदास राहणं
माझ्या मनात सलत
आणि तू हसलास की
माझ काळीज फुलत
माझ्या डोळ्यात आज
तुझ्या स्वप्नाचे गाव आहे
मनापासून सांगतो तुला
ओठावर तुझे नांव आहे
तू दिलेल्या गुलाब फुलाने
माझं आयुष्य बदलून गेलं
कोणलाही दिसू नये म्हणून ते
मी मनात दडवून ठेवलं
प्रेम कोणावर किती करायचं
ज्यान त्यानं ठरवायचं
ज्याला प्रेम करता येत नाही
त्याने फक्त झुरायचं

**—विपूल वानखडे**
बी.कॉम.तृतीय

# हास्य बदनाची थोरवी

हसण्याला नेहमी कारण
लागत असते
म्हणूनच कुणी कुणाची
खिल्ली उडवत असते
मनाला त्यांच्या काहीही वाटो
आपल्या हसण्याची गोडी वाटते
दुसरूयाचा विचार करून
नेहमी हसत जा
हसण्याने तुमचे फुले उमलतील
नाही तर दुसरूयाचे ह्रदय चिरंतील
आता मिही ठरवलयं
अगदी शहाण्यासारख
वागायचं कुणाला काही
दिलं तर त्याबद्दल
काही मागायचं
जिंदगी का गणित
Friends को Plus करो
गमो को Divide करो
खुशियो को Multiply करो
और Life enjoy करो

— अक्षय धुमाळे
बी.कॉम.तृतीय

# माझी चूक

अश्रू गाळत गाळत
स्वत:ला समजाविले
प्रेम करून चूक झाली
हे मला नंतर कळले
केवळ रूप बघून प्रेमात पडलो
पण विचारसरणी बघून
जीवनभर रडलो
कधी तुला पाहिले नाही वळून
पण चेहरा तुझा मनात ठेवीन

**—प्रतिक घाटोळ**
बी.कॉम.तृतीय

# आई - बाप

आई बापाचे
विसरू नको माणसा
तू ते ऋण— आई — बापाचे
झिजले रे तुमच्यासाठी ते ऋण आईबापाचे
मनोभावाने सेवा करून आशीर्वाद घ्यावा तुम्ही
नाही कधी संसारे ते धन आई — बापाचे
विसरू नको मानसा तू ऋण आई — बापाचे
आभाळाहून मोठे आहे मन आई — बापाचे
रातभर जागतील ते नयन आई — बापाचे
विसरू नको माणसा तू ते ऋण आई — बापाचे

**—गोपाल बावस्कर**
बी.कॉम.तृतीय

# जीवन काय आहे

जीवन एक खेळ आहे — तो प्राप्त कराव.
जीवन एक संघर्ष आहे — तो लढवा
जीवन एक रंगमच आहे — तो सजवा
जीवन एक देणगी आहे — ती स्विकारा
जीवन एक कला आहे — ती हस्तगत करा
जीवन एक संधी आहे — ती मिळवा
जीवन एक प्रित आहे — तिचा आस्वाद घ्या.
जीवन एक यात्रा आहे — ती पूर्ण करा
जीवन एक आव्हान आहे — त्यास सामोरे जा
जीवन एक साहस आहे — ते जगण्याचे धाडस करा
जीवन एक दु:ख आहे — त्यावर विजय मिळवा
जीवन एक कर्तव्य आहे — ते पार पाडा
जीवन एक गीत आहे — ते गात रहा
जीवन एक रहस्य आहे— ते उलगडत रहा
जीवन एक सागर आहे — त्यास तरून जा
जीवन एक ध्येय आहे — ते साध्य करायला शिका
मित्रांना खरे जीवन हे सत्यात आहे — ते सत्यानेच जगा

— पवन शेगोकार, बी.ए.प्रथम



# विश्व चारोळ्यांचे

मांगल्याचा दीप
तुझ्या गळ्यात सतत तेवत असो
हीच इच्छा माझ्या मनात
तुझे माझे नाव असो

तुला ही चंद्र आता हवाहवा वाटेल
चांदण्या रात्री माडीवर जावेसे वाटेल
असे एकदाच बघ माझ्या प्रेयसीला
तुलाही प्रेम करावेसे वाटेल

तू दिलेलं पत्र
मी ठेवल जपून
तुझी आठवण आली
की मी ते वाचतो लपून

दिवस निघून गेलेत तरी
आठवणी कायम असतात
प्रत्येक क्षणी त्या मात्र
फुलाप्रमाणे ताज्या असतात

तुझ्या मधूर आठवणी
माझ्याकडे जपून आहेत
कुणाला कळू नये म्हणून
हृदयात लपून आहेत

तिला नेमक काय बोलावं
हे तर मला कळतच नाही
प्रेम असले माझे तरी
घराकडे पाऊल वळतच नाही

तू जवळ असावी
अस सारख सारख वाटत
जवळ घेऊन दर जातांना
मन माझ खुप दाटतं

तुझ्या वाटेत जगतो आहे
तुझा एक श्वास दे
मला जगण्यासाठी
प्रितीचा एक विश्वास दे

मी मनापासून सांगू
तू किती ग्रेट आहेस
मला देवाने दिलेली
तू सप्रेम भेट आहेस

तू विसरशील मला
मी नाही विसरणार तुला
विसरतो का गं कधी किनारा
त्या विस्तीर्ण सागराला

निरोप माझा घेतेवेळेस
तू चिंब रडली होतीस
तेव्हाच कळल तू
माझ्या प्रेमात पडली होतीस

**— नागेश इंगळे**
बी.ए. प्रथम

# पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण



पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण ही मोठी गंभीर समस्या आहे. आपण मॉडर्न आहोत हे दाखवण्यासाठी आज अनेक कुटुंबे आधुनिकतेच्या नावाखाली आपल्या संस्कृतीची घोर विटंबना करीत आहेत. ५०— ६० वर्षाचा जर्जर म्हातारा सुद्धा बॉबकट, तोंडावर मेकअपचे थर चढवून केसांना कलप लावून न शोभणाऱ्या फॅशन्स करून हाय—फाय दिसण्याचा प्रयत्न करणाऱ्या या विदुषकी 'घटपटादी—खटपटी लटपटी' पाहून त्याची कीव कराविशी वाटते. हा असा आदर्श घरातच असल्यावर मुलंही त्याच मार्गाने जाणार यात नवल नाही. आई—बापच जर रोज ऑफीसला जातांना निरोपाच्या रूपात बोळके झालेल्या तोंडाने चुंबन घेत असतील आणि बच्चा, बच्चेका बाबा आणि बच्चे की अम्मा एकाचेवळी टी. व्ही. वर नको ते चित्रपट पाहत असतील तर घरातील तरूण मुल—मुली चळणार नाहीत तर काय?

पाश्चात्य लोक जेव्हा भारतात येतात, तेव्हा इथली शिक्षा उष्णता त्यांना सहन होत नाही. वातावरणाशी समन्वय साधण्यासाठी हे कपडे कमी वापरतात. आपल्या देशात मात्र थंडीपासून संरक्षणासाठी ते हाता पायासकट सगळं अंग झाकून घेतात हे 'सत्य' आपल्याला माहीत नसतं. आपण आपल्याच देशात काहीही कारण नसतांना 'अंग प्रदर्शन' करतो ही लाजीरवानी बाब आहे.

'लज्जा' हेच 'स्त्री' च सौंदर्य, सभ्यता हा अलंकार, शील हेच वैभव आणि ज्ञान हीच संपदा ही मूल्यच आज पायदळी तुडवली जात आहेत.

**— प्रदिप जाधव**
बी.ए.प्रथम

# बाप



आई घराच मांगल्य असते तर बाप घराचं अस्तित्व असतो. पण घराच्याया अस्तित्वाला खरच आम्ही कधी समजून घेतलेलं आहे का? वडिलांना माहित असूनही त्यांच्याविषयी जास्त लिहिल जात नाही. बोललं जात नाही. कोणताही व्याख्याता आई विषयी बोलत राहतो. संत–महात्यांनी आईचचं महत्व अधिक सांगितलेल आहे, देवादिकांनी देखील आईचेचे गोडवे गायले आहेत. लेखकांनी, कवींनी आईच तोंड भरून कौतुक केलं आहे. चांगल्या गोष्टींना आईचीच उपमा दिली जाते. पण बापाविषयी कुठेच फारसं बोललं जात नाही. काही लोकांनी बाप रेखाटला. पण तोही तापट, व्यसनी, मारझोड करणारा, समाजात एक दोन टक्के आप असे असतीलही पण चांगल्या वडिलांबद्दल काय?

आईकडे अश्रूंचे पाट असतात. पण बापाकडे संयमाचे घाट असतात. आई रडून मोकळी होते. पण सांत्वन वडिलांनाच करावं लागलं आणि रडण्यापेक्षा सांत्वन करणाऱ्यावरच जास्त ताण पडतो. कारण ज्योतीपेक्षा समई जास्त तापते ना? पण श्रेय नेहमी ज्योतीलाच मिळत राहतं. रोजच्या जेवणाची सोय करणारी आमची आई आमच्या लक्षात राहते पण आयुष्याच्या शिदोरीची सोय करणारा आमचा बाप मात्र आम्ही सहजपणे विसरून जातो. आई सर्वांसमोर मोकळेपणाने पडू शकते. पण रात्री उशीत तोंड खुपसून रडतो तो बाप. आई रडते पण वडिलांना रडता येत नाही. स्वत:चा बाप वारला तरी बापाला रडता येत नाही. कारण बहीणींचा आधार व्हायचं असतं. पत्नी अर्ध्यावरच साय सोडून गेली तर पोरांसाठी अश्रुंना आवार घालावा लागतो. जिजाबाईंनी शिवाजी घडवला अस अवश्य म्हणावं, पण त्याचवेळी शहाजीराजांची ओढताण सुद्धा लक्षात घ्यावी. देवकीचं, यशोदेच कौतुक अवश्यक कराव पण पुरातून श्रीकृष्णाला डोक्यावर घेवून जाणारा वसुदेव सुद्धा लक्षात ठेवावा. राम हा कौसल्येचा अवश्य पुत्र असेल. पण पुत्र वियोगानं तडपडून मरण पावला तो पिता दशरथ होता. वडिलांच्या टाचा झिजलेल्या चपलांकडे बघितले की, त्याचं प्रेम कळतं. त्यांची फाटकी बनियान बघितली की, कळत आमच्या नशिबाची (भोकं) छिद्र त्यांच्या बनियानला पडतील. त्यांचा दाढी वाढलेला चेहरा त्यांच्या काटकसर दाखवितो.

मुलीला गाऊन घेतील, मुलाला लुंगी घेतील पण स्वत: मात्र जुनी पँट वापरायला काढतील. मुलगा सलूनमध्ये, मुलगी पार्लरमध्ये

खर्च करते पण त्याच घरातला बाप दाढीचा साबण संपला म्हणून आंघोळीच्या साबणाने दाढी खरडत असतो. अनेकदा नुसती पाणी लावून दाढी करतो. बाप आजारी पडला तरी पटकन दवाखान्यात जात नाही. तो आजाराला मुळीच घाबरत नाही. पण डॉक्टर एखादा महीना आराम करायला लावतील याची त्याला भिती वाटते. कारण पोरीच लग्न, पोराच शिक्षण बाकी असतं. घराच उत्पन्नाच दुसर साधन नसतं. येत नसते तरीही मुलाला मेडिकली, इंजिनिअरिंगला प्रवेश मिळवून दिला जातो. ओढताण सहन करून त्या मुलाला पैसे येताच मित्रांना परमिट रूममध्ये पाटर्या देतात आणि ज्या बापाने पैसे पाठविले त्याच बापाची टिंगल करतात. एकमेकांच्या बापाच्या नावांनी ऐमेकांना हाका मारतात. आई घराच मांगल्य असेल तर बाप घराच अस्तित्व असतो. तो जरी काहीही करत नसला तरी तो त्या पदावर असतो. आणि घरच्यांच कर्म बघत असतो, सांभाळत असतो. कोणाला मुलगा होण टाळता येत नाही पण बाप होण टाळता येतं. पण बाप कधीच बाप होण टाळत नाही. आईच्या असण्याला अथवा आई होण्याला बापामुळे अर्थ असतो. मग ज्यांना बापाचा आधारच नाही. अशांविषयी समाजाने सकारात्मक विचार का करू नये? अशांविषयी समाजाने सकारात्मक विचार का करू नये ?

**— अर्जुन शेगोकार**
बी.ए.तृतीय

# गुरु म्हणजे ज्ञानाची गंगोत्री

